# मेट्रो-३ प्रकल्पातील २० वे ब्रेकथ्रू यशस्वीपणे पूर्ण



## ६५ टक्के भुयारीकरण पूर्ण झाल्याचा एमएमआरसीचा दावा

**मुंबई (प्रतिनिधी) :**

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) २०२१ पर्यंत मेट्रो-३ मुंबईकरांच्या सेवेत दाखल करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार भुयारीकरणाच्या कामाला वेग दिला असून, शनिवारी या प्रकल्पातील
२० वा ब्रेकथ्रू यशस्वीपणे पार पडला. नया नगर ते धारावी स्थानक यादरम्यानचे भुयारीकरणाचे काम पूर्ण करत कृष्णा-२ हे टीबीएम (टनेल बोअरिंग मशीन) बाहेर पडले. या २०व्या यशस्वी ब्रेकथ्रूनंतर भुयारीकरणाचे ६५ टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा एमएमआरसीने केला आहे.

मेट्रो-३ मेट्रो प्रकल्प पूर्णतः भुयारी मार्गाचे काम १७ टीबीएम मशीनद्वारे सुरू आहे. १७ टीबीएम मशीन मुंबईच्या पोटात शिरून एक-एक दगड फोडत भुयारी मार्ग तयार करत आहे. त्यानुसार आतापर्यंत १९ ब्रेकथ्रूच्या माध्यमातून काही टीबीएम मशिन भुयारी मार्ग पूर्ण करून मुंबईच्या पोटातून बाहेर आल्या आहेत, तर शनिवारी कृष्णा २ हे टीबीएम २० व्या ब्रेकथ्रूच्या माध्यमातून ५९० मीटरचे भुयारीकरण पूर्ण करत बाहेर आले. या टीबीएमने १३० दिवसांत हे भुयारीकरण पूर्ण केले आहे. आता ६५ टक्के काम पूर्ण झाल्याने निर्धारित वेळेत मेट्रो ३ मुंबईकरांच्या सेवेत दाखल होईल, असा दावा एमएमआरसीकडून केला जात आहे.